// सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ - महाराष्ट्र

# सेवक वार्ता

मार्च-२०२४ वर्ष -५ अंक -५

कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६

## नवी आव्हाने

### सामाजिक वनीकरण विभागातील रोपवाटिकांचे आणि मग्रारोहयो वनीकरण कामांचे मुल्यांकन

पुणे,१९-०३-२०२४

**सामाजिक वनीकरण विभागाकडून सेवक** संघास, विश्वासाने, रोपवाटिकांचे आणि मग्रारोहयो वनीकरण कामांचे मुल्यांकन करणेबाबत विचारणा केली आहे.

गत वर्षी रोपवाटीका कामांचे मुल्यांकन सामाजिक वनीकरण विभाग संचालनालयाने चंद्रपूर वन प्रबोधिनी कडून करून घेतले होते.यंदा त्यांनी हे काम करण्यास असमर्थता व्यक्त केली आहे. गतवर्षी वन प्रबोधिनीने हे काम सेवककडून करवून घेतले होते.आताही गतवर्षीच्याच मोबदला दराने यंदा काम करणे बाबत सेवकच्या मध्यवर्ती कार्यकारिणीची अनुमती विचाराधीन आहे.अशी अनुमती मिळविण्यासाठी, मूल्यांकन करावयाच्या रोपवाटिकांची जिल्हावार विगतवारी,रोपांची संख्या, मुल्यांकन कालावधी, बांधावरील व गट लागवडीमधील वनीकरण क्षेत्राचा विस्तार, जिल्हावार व तालुकावार लाभार्थी संख्या,लागवड केलेल्या रोपांची संख्या, मुल्यांकनाची टक्केवारी,मंजूर असलेले यांचा तपशील उपलब्ध करुन देण्याबाबत संचालनालयास विनंती केली आहे , की जेणे करून प्रस्ताव सादर करणेसोईचे होईल. तसेच कळविले की, येत्या लोकसभा निवडणुकीच्या कामात कर्मचारी व्यस्त असल्यास,जून मध्ये काम करणे योग्य राहील.यावेळी उन्हाची झळ कमी झालेली **असते आणि वयाने ज्येष्ठ सेवक सदस्यांना काम करणे आरोग्य हिताचे व** रोपवाटिकांचे मूल्यांकन करणे इष्ट ठरेल. मग्रारोहयो मधील रोपवनांचे मूल्यांकन मान्सूनचे हंगामात पण पार पाडता येईल.

त्या दृष्टीने श्री विठ्ठल पत्की, समन्वयक, सेवक यांनी जोमाने कामास सुरुवात केली आहे.

### अभ्यासक्रम सुधारीत करून वाचन साहित्य निर्माण करणेचे काम... प्रगतीचा आढावा

महाराष्ट्रातील वन प्रशिक्षण संस्थांमधील वन रक्षक व वनपाल जुने अभ्यासक्रमातील १४ विषयांवरील शिक्षण साहित्य सुधारित करणे, अभ्यासक्रम मंजूरी नंतर, सुधारीत अभ्यासक्रम व वाचन साहित्य निर्मित्तीसाठी सहाय्य करणेकामी कार्यारंभ आदेश अपर प्रधान मुख्य वन संरक्षक, वन संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण,म.रा. तथा संचालक, चंद्रपूर वन प्रशासन,विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी ,चंद्रपूर यांचेकडून प्राप्त झालेत.

वानिकी विषयांचे नवनिर्मित वाचन साहित्याचा पहिला मसुदा खालील सदस्यांनी चंद्रमा प्रबोधिनीस मेलने सादर केला आहे.

१.कार्यालयीन पध्दती आणि लेखा-(१८ तास).
२.सर्वसाधारण वनसंवर्धन- (९ तास)
३.,पुनरुत्पादन पध्दती-(२४ तास)
४.मृदा शात्र-(६ तास )
५. मृदा व जलसंधारण-(२४ तास)
६.वन अभियांत्रिकी-(१२ तास)
७.वनसर्वेक्षण-(२१ तास)
८.वन उपयोगिता-(९ तास)
९.वनसंरक्षण-(१२ तास)
१०.वनस्पतीशात्र-(१८ तास)
११.जैवविविधता व्यवस्थापन- (६ तास)
१२.वन व्यवस्थापन व कार्ययोजना-(६ तास)
१३.वनमिती-(६ तास)

संयुक्त वन व्यवस्थापन - हा विषय श्री. जयप्रकाश पाटील यांना लिखाणासाठी वाटप केला आहे.

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र ने प्रस्तावित केलेल्या विहित अभ्यासक्रमासोबत वाचन साहित्याची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी, महाराष्ट्र राज्याच्या वन विभागाच्या शिक्षण विभागातील खालील सदस्यांचा समावेश असलेली समिती स्थापन करणेत आली आहे. या समितीचे कार्य सेवानिवृत्त वनकर्मचारी संघटनेने (सेवक) तयार केलेल्या वाचन साहित्याचे पुर्नरावलोकन करणे, त्यातील मजकूर अंतिम करणे, आणि कोणत्याही आवश्यक बदलांसाठी आवश्यक शिफारसी प्रदान करणे इ.

विषय गट क्रमांक-1 सर्वसाधारण वनसंवर्धन शास्त्र, वृक्ष संवर्धन आणि त्याच्या समुपयोजन पद्धती. पुनरुत्पादन पद्धती, गवताळ क्षेत्र विकास/व्यवस्थापन, जैव विविधता व्यवस्थापन,

अधिकाऱ्याचे नांव व पदनाम

१) श्रीमती पियुषा जगताप, अपर संचालक (प्रशिक्षण)
२) श्री. अविनाश कुमार, अपर संचालक (प्रशासन)
३) श्रीमती मनिषा भिंगे,अपर संचालक (मुख्यालय)
संचालक, चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी चंद्रपूर

विषय गट क्रमांक-२ : वन व्यवस्थापन, वनस्पती शास्त्र, वन उपयोगिता, वनमिती, वनसंरक्षण

अधिकाऱ्याचे नांव व पदनाम

१) डॉ. शैलेन्द्र जाधव, संचालक, कुंडल प्रबोधिनी (वने), कुंडल
२) श्री. अमोल थोरात, वि. व.अ.(संशोधन), अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), पुणे
३) श्रीमती तृप्ता निखाते, संचालक, वनप्रशिक्षण संस्था, जालना

गट क्रमांक-३ : मृद शास्त्र, मृद व जलसंवर्धन, वनसर्व्हेक्षण आणि GIS वनअभियांत्रिकी, कार्यालयीन कामकाज व लेखा

अधिकाऱ्याचे नांव व पदनाम

1) श्री. हेमन्त शेवाळे, संचालक, दा.चौ. वन प्रशिक्षण संस्था, पाल
2) श्रीमती मुक्ता टेकाडे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था,चिखलदरा
3) श्री. प्रशांत कोराळे,अपर संचालक मु. व.सं. (शि.व प्र), पुणे

### उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु सदिच्छा भेट

दि.७ मार्च रोजी कवयित्री बहिणाबाई उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु डॉ. एन. के. ठाकरे यांची

सदिच्छा भेट घेउन त्यांना सेवक संघ, धुळे शाखेतर्फे प्रकाशित बारीपाडयातील रानभाज्यांची माहिती पुस्तिका व सेवक संघाचे माहिती पत्रक भेट दिले. डॉ. ठाकरे, यांचे वय ८६ वर्षे असून ते आजही क्रियाशील आहेत.



## वेधक वृत्त
### प्रासंगिक...





सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ महाराष्ट्रासाठी ही भूषणावह बाब आहे की श्री चैत्राम पवार यांच्या सोबत धुळे शाखेच्या मार्फत त्यांच्या कामाची दखल घेत रानभाज्या माहिती पुस्तकाची निर्मिती व प्रकाशन केले आहे.



श्रीमती रशीला वाढेर यांच्यानंतर हे दुसरे व्यक्तीमत्व आहे, जिथे सेवक संघाने सामाजिक कार्याची ओळख जनमानसात करून देत आपल्या नजरेचा टप्पा कुठपर्यंत विस्तारीत आहे, याची झलक दाखवली आहे. सेवक संघाची "युवा मने" जिंदाबाद.

### २१ मार्च जागतिक चिमणी दिवस

चिमणी हा एक अद्भुत पक्षी आहे, या पक्ष्याचे रक्षण करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य असले पाहिजे. चिमण्यांसारख्या लहान आणि सुंदर पक्ष्यांना वाचवणे आवश्यक आहे, त्यासाठी त्यांच्यासाठी नवीन अधिवास विकसित करणे आवश्यक आहे, ही जबाबदारी आपण घेतली पाहिजे. घरटे आणि फीडर सर्वसामान्यांसाठी उपलब्ध करून द्यायचे आहेत. त्यांना पाणी द्या आणि परिसंस्थेचे रक्षण करून आपल्या भागातील जैवविविधतेचे संवर्धन करा. जागतिक चिमणी दिनाच्या शुभेच्छा!




### २१ मार्च... जागतिक वन दिवस

जागतिक वन दिन म्हणून ओळखला जाणारा आंतरराष्ट्रीय वन दिन हा दरवर्षी २१ मार्च रोजी मानवतेच्या आणि पृथ्वीच्या अस्तित्वासाठी जंगले आणि झाडांच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी साजरा केला जातो. परिसंस्थेसाठी आणि आपल्या अस्तित्वासाठी जंगले महत्त्वपूर्ण आहेत.
आपल्या संत तुकाराम महाराजांनी ४०० वर्षांपूर्वी प्राणी व वनस्पतींचे महत्व आणि संबंध समाजास समजावून सांगितले

वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे
पक्षी ही सुस्वरे आळविती
येण सुखे रुचे एकांताचा वास
नाही गुणदोष अंगा येत
आकाश मंडप पृथिवी आसन
रमे तेथे मन क्रिडा करी
तुका म्हणे होय मनासी संवादु
आपलासी वाद आपणासी






## *सदस्यांचे लेख....*



## वनौषधी उत्पादन - एक आव्हान

मनोहर अ. सैंदाणे
से.नि. विभागीय वन अधिकारी पुणे

**प्रस्तावना**

आयुर्वेदिक शास्त्र निर्माण केव्हा झाले? कदाचित ब्रह्मदेवाने प्रजा सृष्टी निर्माणी केली यापूर्वीच आयुर्वेदाचे स्मरण केले असावे. आज उपलब्ध असलेले, 'चरक संहीता] शुश्रुतसंहीता, अष्टागसंग्रह, आणि काश्यप-संहीता हे ग्रंथ पूर्वीचेच आहेत. मध्यकाळात अष्टांगहृदय, भावप्रकाश, योग रत्नाकर तयार झालेत. तद् नंतर शारंगधर, रस रत्नसमुच्य, निघंट रत्नाकर, इ. ग्रंथ आलेत. भारतातील ऋषिमुनींनी आयुर्वेद ही जगाला दिलेली देणगी आहे.

समर्थ रामदास दासबोधात म्हणतात.

*वाट पुसल्याविन जाऊ नये।फळ ओळखल्याविन खाऊ नये।*
*पडली वस्तु घेऊ नये । एकाएकी*

आयुर्वेदात म्हटले आहे की, औषधे तज्ञाच्या सहाय्याने व मार्गदर्शनाने वापरली तर अमृताचे कल्प ठरतात. पण अजानाने किंवा अनिभत लोकांचे सल्याने वापरली तर ती शस्त्राप्रमाणे व्रण निर्माण करुन, विजेप्रमाणे जाळून किंवा विषाप्रमाणे रक्तात जाऊन प्राणनाशक ठरु शकतात. औषधी गुणधर्माची पुस्तके / लेख हे वाचून उपचार घेण्यासाठी नसून उपचाराची दिशा ठरविण्यासाठी असतात.

आपणास वनौषधीची माहिती व्हावी या दृष्टीने निवडक वनस्पतीची नावे व औषधी उपयोग व शक्य असल्याचा लागवडीची माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. भारतात आयुवैदीक औषधोउपचार फारच विपुल प्रमाणात होत असतो. बऱ्याच औषधी वनस्पती आपल्या शेजारीच असतात त्याची ओळख व माहिती घेणे जमेची बाजु आहे. सदर वनौषधी वनस्पती / वृक्षांची लागवड योग्य प्रमाणात, योग्य पध्दतीने केल्यास शेतकऱ्यास खूप आर्थिक फायदा होऊ शकतो. यासाठी आयुर्वेदीक औषधी तयार करणाऱ्या कंपन्याशी संपर्क करुन बाजाराची (मार्केटींग) शास्वती घेऊन लागवड घेणे अपेक्षीत आहे. बऱ्याच बडया शेतक-यांनी असे प्रयोग करुन पैसा उभारला आहे. दक्षिण भारतात आंतरपीक घेऊन शेतीवर प्रयोग केले आहेत. उदा. तेलबिया देणारे वृक्ष (पाम वृक्ष), काळी मिरी, दालचिनी, लवंग, वेलदोडा, खैर इ. ची लागवड केली आहे. गुजरातमध्ये वटवा भागात आंतरपीक घेऊन निलगीरी, सुबाबुळ, सुरु इ. ची लागवड करुन स्थानिकांची लाकूडफाटयाची गरज भागवून आर्थिक फायदा केला आहे. उत्तर भारतात गव्हाचे आंतर पीक घेऊन, पॉपलर वृक्ष (ज्याचे लाकडापासुन आगपेटीच्या काडया, पॅकींग खोके तयार करतात) याची लागवड केली आहे. महाराष्ट्रातान देखील ड्रॅगन फ्रुट, बांबू, सागवान, सुरु, खैर, कोरफड, निलगीरीची लागवड घेण्यात आल्याची उदाहरणे आहेत. विदर्भातदेखील साग सिल्व्हर ओक, कॉफी, ब्लॅकपेपर, निलगीरी, सुरु, कॉफीचा ॲग्रो-फॉरेस्ट्रीचे प्रयोग होत आहेत. वर्धा जिल्हयात तर बांधावरील सागवान लागवडीने शेतकरी वर्ग सुखावला आहे. अमरावती भागात पिंपळी (औषधी) चे पीक घेऊन शेतक-यांनी आर्थिक पाठबळ मिळविले आहे. याकरीता प्रायोगीक तत्वावर पीक पॅटर्न बदल करणे ही काळाची गरज आहे.

बऱ्याच वनस्पतीची लागवड ही बियापासून, खोडापासून (शाखीय भाग) व काहींची मुळांच्या फुटव्यापासून करतात. प्रथम रोपवाटीकेत बिया, खोडे, फुटवे, जडया पिशव्यात वाढवावेत. पिशव्यात माती, रेती, शेणखत प्रमाणात घालावे. प्रमाणात पाणी दयावे. सुयोग्य उंचीचे रोपे शेतात ठराविक अंतरावर खड्डे खोदून जुन महिन्याचे प्रथम आठवडयात लागवड करावे. चांगले कुंपणाने रोपांना संरक्षण देणे गरजेचे आहे. वृक्ष प्रजातींना फळे येईस्तोवर आंतरपिकावर भागवणे गरजेचे आहे. लागवड करणाऱ्यांनी माहितगार अधिकाऱ्याकडून माहिती करुन घ्यावी. मगच प्रयोग करणे योग्य राहील. काही निवडक औषधी वनस्पतीची माहिती वाचकांना देण्यात येत आहे.

**१) बेल :-- (Aegle marmelos)**

हे वृक्ष वर्गातील असुन त्याचे फळ अतिशय आयुर्वेदीक उपयोगी आहे. हा वृक्ष उष्ण कटीबंधात येत असून संस्कृतमध्ये याला बिल्व संबोधतात. देवाधिदेव महादेवास बेल पत्र वाहिले जाते. बेलफळाच्या सेवनाने अस्थमाचा त्रास कमी होतो. तसेच भूक लागत नसेल तर भूक वाढवण्यास मदत होते. मलावरोध, बध्दकोष्ठता, अतिसार, आतडयाचा विकार बेलफळाच्या रसाच्या सेवनाने कमी होतो. पानांचा रस दिवसातून दोनदा घेतल्यास मधुमेह व पोटदुखीवर फायदेशीर आहे. बेल फळाचे सरबत उन्हाळ्यात घेतल्यास निरोगी राहतो. तोंडात फोड आल्यास गर पाण्यात उकळून गुळणा केल्यास उपयोग होतो. बेलाच्या नियमित नियमित सेवनाने अपचनपासून कायम मुक्ती मिळते. वाळलेल्या बेल फळाच्या गराची पावडर गरम दुधात १ चमचा घेतल्यास शरिरात नविन रक्त तयार होण्यास सुरवात होते. गर्भवती महिलांना उलटी होऊ नये म्हणून याकरिता बेलाचा गर कुटून तांदळाच्या पाण्यासोबत लगदा तयार करावा. तो छानणी करुन पिण्यास दयावा. बेलाचे गर खडीसाखरमध्ये मिसळुन प्याल्यास उलटया, हगवण, मळमळ बंद होते. ऊन लागल्यास पानाना कुटून मेहंदीसारखे, हातापायावर, डोक्यावर, छातीवर लावावे व चोळावे. खडीसाखर टाकून सरबत पिण्यास दयावे. सदर वृक्षाची लागवड बियापासून होऊ शकते.

... क्रमश: पुढील अंकात...

२० मार्च जागतिक चिमणी दिनानिमित्त खास हा लेख..

## अमेरीकेतील चिमण्यांचे पुण्यातल्या मैत्रीणीशी हृदयस्पर्शी नाते.

✍रमेश खरमाळे, माजी सैनिक...

तो दिवस मला आजही आठवतोय. मला रात्री अचानक एक वाजता फोन आला. मी भर झोपेतून खडबडून जागा झालो होतो. मोबाईल हातात घेतला व नंबर पाहीला तर तो परदेशी कॉल असल्याचे समजले. मी मोबाईल रिसिव्ह केला व हॅलो बोललो. समोरून एक महिला बोलत होती व डिस्टर्ब केले म्हणून क्षमा मागत होती. आपण कोठून बोलताय विचारले तर अमेरिकेतून बोलत आहे असे सांगितले. काय विशेष विचारले तर त्या सांगू लागल्या की आपला चिमण्यांविषयी संभाषणाचा इको फ्रेंडली क्लब वरील फेसबुक पेज वर अपलोड केलेला व्हिडिओ पाहीला व तो खुपचं भावला व रहावलेच नाही म्हणून आपणास फोन केला. पुढे त्या बोलू लागल्या व त्यांची त्यातील काही वाक्य मात्र काळजाला भिडणारी होती व त्या वाक्यांनी माझ्या शरीरावरील रोम खडे झाले होते. त्या सांगत होत्या पुण्यामध्ये माझे लहानपण गेले अगदी लग्न होईपर्यंत मी तेथे खुप खेळले बागडले. वडीलांनी घराच्या आवारात पक्षांसाठी खुप झाडे लावली होती. ते पक्षी पाहुन त्यांच्या विषयी खुप कुतुहल वाटायचे. त्यांच्या प्रेमात मी कधी पडले समजलंच नाही. या प्रेमाचे रूपांतर आमचे मैत्रीत झाले. त्यांना मी रोज खाण्यासाठी धान्य टाकायची. त्या सुरूवातीला धान्य टाकताच क्षणी उडून जायच्या व मी तेथून निघून गेले की मग टाकलेले धान्य टिपुन खायच्या. या खेळात मी व त्या अगदी फार जवळ जवळ येत गेलो. आता त्या माझ्या हातात धान्य पाहीले की कधी कधी हातावरच येऊन बसायच्या. धान्य टाकायला उशीर झाला की जोर जोराने चिवचिवाट करायच्या. अगदी मुलाने हट्ट करावा तशा त्या हट्टी होत चालल्या होत्या. मी कुमारीका अवस्थेत आता या चिमण्यांची आई झाले होते. त्यांच्या जेवण

पाण्याची काळजी मी रोज घेत असे व त्यांच्याशी संवाद साधत असे. मला माहीत नाही पण कोणत्या जीवनाची हि पुण्याई कामी आली होती माहीत व यांची सेवा करण्याचे मला भाग्य लाभले होते.

पुढे माझे शिक्षण पूर्ण झाले. आई वडीलांनी माझे लग्न करून दिले. लग्नानंतर मी पतीसोबत अमेरीकेला रहायला गेले. चिमण्याचा सहवास मिळत नसल्याने मी पहिले खूप उदास व्हायची. कधी कधी तर हातात धान्य घेऊन व्हरांड्यात यायची व नाराज होऊन माघारी फिरायची कारण अंगणात चिमण्याच नसतं.

अमेरिकेत वर्षातील ४ महिने तर सुर्य दर्शन घडने कठिणच होते. बर्फ बारी सुरू झाली होती त्यामुळे पक्षी पहायला मिळायचे परंतु आपल्या सभोवताली नेहमीच चिवचिव करणा-या चिमण्या मात्र पहायला मिळणे दुर्मिळच होत. लग्नाचे दोन वर्ष चिमणी सारखे भुर्कुन कधी उडुन गेले कळलेच नाही.

एके दिवशी बाल्कनीत फिरत असताना अचानक माझी नजर एका जागेवर खिळुन राहीली. अमेरिकेतील तो क्षण तर माझा आयुष्यात अतिशय आनंद देणारा ठरला. चक्क मी समोर अंगणात चिमणी पाहत होते. मला तर या दृष्यावर विश्वासच बसत नव्हता. आता ती चिमणी रोजच दिसू लागली होती.

मी त्या दिवसापासून अंगणात ती चिमणी रोज धान्य वेचुन खायला यावी व मला पहायला मिळावी म्हणून तीला धान्य टाकु लागले. ती एकच चिमणी रोज दिसायची. मी पण.. एक त एक म्हणून धान्य टाकण्याचा नित्यक्रम चालूच ठेवला. कालांतराने दोन, तीन, चार अशा चिमण्या वाढत गेल्या व मी धान्य टाकतच गेले. आता त्यांची व माझी चांगली ओळख निर्माण झाली होती व त्यांना पण माझा लळा लागला होता. ८ महिन्यांत त्यांची संख्या जवळपास १५ / २० झाली होती. आता त्या माझ्या व मी त्यांच्या चांगलीच परीचयाची झाली होती. गॅलरीत बसुन हाताच्या अंतरावर त्या धान्य टाकताना बसु लागल्या होत्या. आता मी अंगणात धान्य टाकण्याऐवजी त्यांना गॅलरीत धान्य टाकत होते व त्या तेथे येऊन खाऊ लागल्या होत्या. माझी धान्य टाकायची वेळ अगदी त्यांच्या परीचयाची झाली होती. मी दरवाज्याची कडी काढायला खोटी की त्या आवाजाने ते तेथे हजर होत असत. आता त्यांनी माझ्या घराच्या शेडच्या आवारातच त्यांनी घरटी केली होती. बर्फ पडायला सुरुवात झाली होती. भयंकर पडणा-या बर्फात या कशा राहतील समजत नव्हते. थंडीचा जोर वाढला होता. त्या दिवशी धान्य टाकायला मला थोडा उशीर झाला होता. दरवाजावर सारखा टक टक आवाज येऊ लागला. दरवाजा का वाजतोय समजायला मार्ग नव्हता. दरवाजा उघडला तर समजले की चिमण्या दरजावर चोची आपटत होत्या व धान्य मागत असल्याचा संकेत देत होत्या कारण बर्फाने सगळा परिसर पांढराशुभ्र होऊन गेला होता व त्यांच्या पोटापाण्याचा गहन प्रश्न निर्माण झाला होता. त्यानंतर मी त्यांचा धान्य घालण्याचा नियम कधीच मोडला नाही व कधी कधी दरजावर मुद्दाम त्यांचा चोचीचा आवाज ऐकण्यासाठी मी उशीर करायची . दोन वर्षांत त्यांची संख्या जवळपास ६०/७० वर पोहचली. खूप आनंद झाला मला हे सर्व पाहून व अनुभवून. आता मी एकटी नव्हते तर आमचं कुटुंब जवळपास ७२ सदस्यांच झाले होते. गेल्या महिन्यात मी अचानक आजारी पडले. मला उठणे बसणे कठीण झाले. पती या कठीण काळात माझी सेवा करायचे. त्यांना खायला घालायचे माझ्या लक्षातच आले नव्हते व ना कधी दरवाजावर टकटक झाली. आजारपणात मला माहित नाही पण कसा काय विसर पडला कळलेच नाही. जवळपास ४ दिवस मी बेडवरून उठू शकले नव्हते. आज ५ व्या दिवशी मी स्वतः उठून बसले व बाथरूममध्ये जाऊन आले. तर लगेच दरवाजावर टकटक सुरू झाली. मला तर हे ऐकून आश्चर्याचाच धक्काच बसला. गेली ४ दिवस यांनी कधीच दरवाजावर टकटक केली नव्हती. कसं बरं समजलं असेल त्यांना की मी आजारी आहे? व आपण दरवाजा वाजवून या आजारी आईला सतावने उचित नाही म्हणून. आज फक्त घरात उठून बसले तर लगेच दरवाजा ठोठावला. असे कसे घडले असेल? कोणत शास्त्र यांना आवगत असेल बरं? याच विचारात गेली कित्येक दिवस मी होते. याच उत्तर मला अनेक दिवसांनी मिळाले. आज आपला व्हिडिओ पाहण्यात आला आणि पक्षांना खरोखरच व्हायब्रेशन समजतात याची खात्रीच पटली. मी मला रोखुच शकले नाही तुमच्या त्या व्हिडिओ मधील विधान ऐकुन व लागलीच आपणास फोन केला.

पंधरा ते वीस मिनिटे दिपालीजी बोलत होत्या. त्यांचे कानावर पडणारे शब्द अंगावर काटे उभे करत होते. आनंद याच गोष्टीचा वाटत होता की एक चिमणी पासुन ६० ते ७० चिमण्यांचा गोतावळा दिपाली ताईंनी अन्नदाता म्हणून उभा केला होता तो पण परदेशात. ताई तुमचे पक्षांच्या पाठीशी सदैव असेच प्रेम राहो व आपला हा गोतावळा अतिशय मोठा होत राहो व आपल्या हातुन त्यांना सदैव अन्नदान मिळत राहो हीच सदिच्छा.

आज आपण मला चिमणी पक्षांचं आगळवेगळ रुप दर्शन घडवलत त्याबद्दल निश्चितच ऋण व्यक्त करतो. आज जागतिक चिमणी दिन या आपल्या सर्व चिमण्या ताईंना जागतिक चिमणी दिनाच्या खूप खूप हार्दिक शुभेच्छा माझ्यातर्फे नक्कीच द्याल ही सदिच्छा व्यक्त करतो.

मित्रांनो पक्षांचे जतन आणि संवर्धन हाच पिकांवर परिणाम करणा-या किडींवर नियंत्रण उपाय आहे. त्यामुळे त्यांचे जतन करा व त्यांना उन्हाळ्यात पाणी व अन्न ठेवत चला.

## आजीवन सदस्य

श्री. अशोक श्रीराम खुणे, सेवा निवृत्त वि.व.अ., नागपूर, श्री. जी. एस. खांडेकर, सेवा निवृत्त वि व.अ., श्री. एन. डब्ल्यू. कावळे, सेवा निवृत्त स.व.स. यांनी आजीवन सेवक सभासद शुल्क अमरावती सेवक शाखेत जमा करून आजीवन सदस्यत्व स्विकारले आहे. त्यांचे सेवक संघ परिवारात स्वागत.

## निधन वार्ता

धुळे निवासी सेनि विवअ, श्री. डी. यू. पाटील, यांचे रेल्वे प्रवासात हार्ट अॅटॅक आला होता. जळगाव येथे उपचारादरम्यान दि.४-२-२४ रोजी निधन झाले. त्यांचे वय ६४ वर्ष होते. दि.५-२-२४ रोजी एकविरा देवी अमरधाम, धुळे येथे अंतिम संस्कार करण्यात आले



श्री. व्ही. के. वाळके यांचे दिनांक ७ मार्च २०२४ रोजी पुणे येथे वृद्धापकाळाने निधन झाले. ते विभागीय वन अधिकारी होते. त्यांचे अंतिम संस्कार भोसरी स्मशानभूमी येथे करण्यात आले.

सेवक संघ सदस्यांतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर त्यांचे आत्म्यास सदगती देवो, ही प्रार्थना.

*****

केवळ खाजगी वितरणासाठी

प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे

संपादन - एस. के. गवळी